# नॅशनल स्पोर्टस्‌मध्ये कमला कॉलेजला चार सुवर्ण

प्रतिनिधी
कोल्हापूर

अमृतसर (पंजाब) येथे झालेल्या ऑल इंडिया वायएसडीए नॅशनल ऑल स्पोर्टस् चॅम्पियनशीपमध्ये कोल्हापुरातील कमला कॉलेजच्या चार महिला खेळाडूंनी ७ सुवर्ण पदके मिळवली. या महिला खेळाडू महाराष्ट्र संघातून स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या. त्यांनी कमावलेल्या ७ सुवर्ण पदकांमुळे महाराष्ट्र संघाला सर्वसाधारण विजेतेपद मिळणे अगदी सोपे झाले.

युथ अॅण्ड स्पोर्टस् डेव्हलपमेंट असोसिएशन ऑफ इंडियाने या स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत महाराष्ट्र संघातून उतरलेल्या कमला कॉलेजच्या आसमा कुरणेने १० किलो मीटर व ८०० मीटर धावणेत प्रत्येकी सुवर्ण पदक पटकावले. तसेच १७ वर्षाखालील मुलींच्या गटात तन्वी जामसांडेकरने १०० व २०० मीटर धावणे प्रत्येकी १ सुवर्ण तर १९ वर्षाखालील मुलींच्या गटात ही भक्ती जाधवने १०० व २०० मीटर धावणेत प्रत्येकी १ सुवर्ण पदक पटकावले. याचबरोबर कबड्डी स्पर्धेत जेतेपद मिळवलेल्या महाराष्ट्र संघातील खेळाडू स्नेहल शिंदेला सुवर्ण पदक देऊन सन्मानित केले. या सर्व पदक प्राप्त खेळाडूंना ताराराणी विद्यापीठ कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतीकुमार पाटील, सचिव प्राजक्त पाटील, प्राचार्य डॉ. तेजस्विनी मुडेकर, शारिरीक शिक्षण संचालक ज्योती गावडे व क्रीडा शिक्षक शामराव मासाळ यांचे मार्गदर्शन लाभत आहे.



**कोल्हापूर : सुवर्ण पदके प्राप्त कमला कॉलेजच्या खेळाडूंचा डॉ. क्रांतीकुमार पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. तेजस्विनी मुडेकर, ज्योती गावडे, पूजा ठाकूर व शामराव मासाळ आदी उपस्थित होते.**

Scanned by CamScanner